फिर्यादी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर  **P.S.(ठाणे):** मुकुंदवाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0498  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/09/2026 05:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिंनाक पासून):** 08/09/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 08/09/2026

**Time From (वेळेपासून):** 19:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 09/09/2026  **Time (वेळ):** 05:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/09/2026 05:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुकुंदवाडी पोलीस स्टेशन ,समोर रोडवर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संतोष प्रभाकर तिगोटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक,विभाग, छत्रपती संभाजीनगर,मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक,विभाग, छत्रपती संभाजीनगर,मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9923453888

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत बाळासाहेब पासलकर | | | 1. नेमणुक पोलीस स्टेशन मुकुंदवाडी,ताजि छत्रपती संभाजीनगर ,मुकुंदवाडी,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुभाष छगन राठोड | | | 1. नेमणुक पोलीस स्टेशन मुकुंदवाडी,ताजि छत्रपती संभाजीनगर ,मुकुंदवाडी,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |



Scanned with OKEN Scanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपय दराच्या 10 भारतीय चलनी नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 09/09/2026

मी संतोष प्रभाकर तिगोटे, वय 40 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, मो.नं.9923453888

मी वरील प्रमाणे असुन दि. 07/09/2026 रोजी तक्रारदार महिला नामे- श्रीमती प्रतिभा संतोष सिनगारे वय 42 वर्षे व्यावसाय गृहीणी रा. राजनगर,मुकुंदवाडी ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दोन शासकीय पंचासमक्ष लोकसेवक पीएसआय पासलकर व त्यांचा रायटर राठोड पोलीस पो.स्टे.मुकुंदवाडी यांचे विरुध्द तक्रार दिली ती पुढील प्रमाणे-

" मी अर्जदार आपल्याकडे तक्रार करते की, मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. दिंनाक 01/07/2026 रोजी आमच्या राजगनर येथील गल्लीतील राहणारा योगेश खकाळ रा.राजगनगर याचे तक्रारीवरुन माझ्यावर तसेच माझे दोन्ही मुले अक्षय व लहान मुलगा जयमंगल यांचेवर मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्या गुन्हयात माझा मोठा मुलगा अक्षय सिनगारे याला अटक झाली असुन सध्या तो हर्सुल कारागृहात आहे. त्या गुन्हयाचा तपास पीएसआय पासलकर साहेबांकडे आहे.

दिनाक 05/09/2026 रोजी पासलकर साहेब व त्यांचा पोलीस रायटर राठोड पोलीस यांनी मला फोन करुन पोलीस ठाण्यात येण्यास सांगीतले, त्यावरुन मी पोलीस ठाणे मुकुंदवाडी येथे गेले असता पासलकर साहेब व राठोड साहेब या दोघांची समक्ष भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना माझ्या मुलाचा जामीन होण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी मला मदत करा व गुन्हयाचे दोषारोपत्र लवकर पाठवुन दया असे बोलली असता पासलकर साहेबा समक्ष त्यांचा रायटर राठोड पोलीस मला म्हणाले त्याचा जामीन होणार नाही आणि त्याच्यावर मोकका लावणार आहे व पंधरा वर्षे जेलच्या बाहेर येऊ देणार नाही व तुम्हा दोघांची अटकपुर्व झालेली जामीन रद्द करेल असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना असे करू नका माझ्या मुलाला जेलमधुन बाहेर येण्यासाठी मदत करा अशी विंनती केली असता राठोड पोलीस यांनी मला थोड बाजुला बोलावुन सांगीतले की, तुमच्या मुलाला जेलमधुन सोडवण्यास मदत करण्यासाठी तसेच गुन्हयात मदत करुन न्यायालयात लवकर दोषारोपपत्र पाठविण्यासाठी आम्हाला पंधरा हजार रुपये दयावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना पैशाची सोय करते असे म्हणुन निघुन आली आहे. परंतु सदर कामासाठी मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नाही. म्हणुन मी लाच मागणीची तक्रार देण्यास लाचलुचपत प्रतिंबध विभागास संपर्क केला आहे.

आज रोजी राठोड साहेब यांनी मला फोन करुन पोलीस ठाण्यात बोलविले आहे. त्यानुसार मी त्यांना माझा लहान मुलगा जयमंगल यासह भेटण्यास जाणार आहे. तेव्हा मी त्यांना माझा मुलगा अक्षय याची सुटका होण्यास व दोषारोपपत्र सादर करण्यास मदत करण्याबाबत बोलणार आहे. त्यावेळी पासलकर साहेब व त्यांचा रायटर राठोड



Scanned with OKEN Scanner

पोलीस यांनी अथवा त्यांचे वतीने इतर कोणी वरील कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात व पासलकर साहेब तसेच त्यांचा रायटर राठोड पोलीस यांचेत कोणताही अर्थिक अगर उसनवारी व्यवहार नाही. तसेच त्यांचेत व माझ्यात कोणतीही वैर दुश्मनी नाही. वरील तक्रार मला वाचता येते परंतु व्यवस्थित लिहीता येत नसल्याने माझ्या सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे. "

तक्रारदार यांच्या वरील तक्रारीवरुन लोकसेवक पीएसआय पासलकर व त्यांचा रायटर राठोड पोलीस पो.स्टे. मुकुंदवाडी यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निणय सर्वानुमते घेण्यात आला. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या अनुषंगाने प्रक्रीयेची सर्व माहीती देऊन, सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार महिला श्रीमती प्रतिभा सिनगारे यांचेकडे दिला व पंच क्र.1 यांना सोबत देऊन लोकसेवक पीएसआय पासलकर व त्यांचा रायटर राठोड पोलीस यांचे लाचमागणी पडताळणीसाठी पो.स्टे.मुकुंदवाडी येथे दि.07/09/2026 रोजी सकाळी 14.22 वा.पायी रवाना केले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे 14.47 वा.सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर घेऊन बंद केला. व पंच क्र.1 जाधव यांना सुरक्षित ठिकाणाहुन गेल्यापासुन परत येई पर्यंत काय घडले याची विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार प्रतिभा सिनगारे असे पायी पो.स्टे.मुकुंदवाडी येथे गेलो. त्या ठिकाणी पीएसआय पासलकर व त्यांचा पोलीस रायटर राठोड यांची भेट झाली. त्यावेळी पीएसआय पासलकर हे पो.स्टे.च्या वरच्या मजल्यावरुन खाली आले. त्यानंतर पोलीस रायटर राठोड यांनी तक्रारदार महिला सिनगारे यांना त्यांच्या जेल मधील मुलाविषयी विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या आईने त्यांच्या वहिनीकडे खर्चासाठी पैसे ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस राठोड यांनी तक्रारदार यांना पैसे आणले का असे विचारत होते. त्यावेळी तक्रारदार यांनी राठोड यांना तेवढे पंधरा नाहीत तुम्ही मला त्या दिवशी पाचच बोलले होते पाच हजार देते. त्याच दिवशी तुमचं काम करते पण तुम्ही फोन पे नाही म्हणता असे बोलल्या त्यावेळी तक्रारदार यांना आता कुठं जायचं असे विचारले तर त्यांनी आकाशवाणीला सांगितले तर राठोड यांनी पैसे घेऊन येण्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही परत आलो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार महिला सिनगारे यांना विचारपुस करता त्यांनी पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मधील तक्रारदार महिला यांचे पोलीस राठोड यांचेशी झालेले लाचमागणीतील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले.

सदर लाचमागणी संभाषणात लोकसेवक रायटर राठोड पोलीस यांनी तक्रारदार महिला यांचेकडे त्यांच्यावर व त्यांच्या मुलावर दाखल असलेल्या गुन्हयाविषयी चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या आईने त्यांच्या वहिनीकडे पाहुण्यांसाठी दहा हजार रुपये ठेवल्याचे बोलत होत्या. त्यावेळी पोलीस रायटर राठोड यांनी "ठिक हाय.. आणले का तुम्ही" त्यावेळी तक्रारदार यांनी वहिनीकडे जायचंय असे सांगितले तर राठोड यांनी ठिक हे त्यावेळी तक्रारदार यांनी काय म्हणले सर असे विचारले तर त्यांनी याना जाऊन या ना असे म्हणुन पैसे घेऊन येण्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी हा ना सर ते तेवढे नही हे ना पंधरा, तुम्ही मला त्यादिवशी पाचच बोलले होते पाच हजार देते म्हणुन त्यावेळी राठोड यांनी आता मी काही म्हणलो का तुम्हाला..त्यावेळी तक्रारदार नही नही मी तेच सांगते हे ना, तर मी तुम्हाला त्यादिवशीच तुमच काम करते पण तुम्ही फोन पे नही म्हणता त्यावेळी राठोड मग आता कुठ जायच त्यावेळी तक्रारदार आकाशवाणीला त्यावेळी राठोड या मग असे म्हणुन तक्रारदार यांना लाचेची रक्कम 5,000/- रुपये घेऊन येण्यास सांगुन ती रक्कम स्वत: स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्या बाबत सविस्तर लाचमागणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आलेला आहे. तक्रारदार यांचेकडे दयावयाची लाचेची रक्कम दि.07/09/2026 रोजी उपलब्ध नसल्याने सापळा कारवाई दि.08/09/2026 रोजी करण्याचा निणय सर्वानुमते घेण्यात आला.

त्यानंतर दि.08/09/2026 रोजी सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले सदर सापळा कारवाईत सापळापुर्व पंचनामा करुन, तक्रारदार यांचेकडे लाचेची रक्कम 5,000/- रुपये ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. व पंच क्र.1 यांना सोबत देऊन पो.स्टे.मुकुंदवाडी येथे 18.24 वा.पाठविण्यात आले असता, तक्रारदार यांनी पंच क्र.1 यांना सोबत घेऊन पो.स्टे.मुकुदवाडी येथे पीएसआय पासलकर व त्यांचा रायटर पोलीस राठोड यांची समक्ष भेट घेतली त्यावेळी पीएसआय पासलकर व पोलीस राठोड यांनी तक्रारदार महिला सिनगारे यांचेशी चर्चा केली त्यावेळी तक्रारदार यांनी जाण्यास निघाले असता पीएसआय पासलकर यांनी बसा इकडं या मावशी..झाल का ते असे विचारले त्यावेळी तक्रारदार यांनी आं..तेवढं नाही झालं ना सर अस बोलल्या त्यावेळी आहो माहीती हायना त्याला चार पाच लागता त्यावेळी तक्रारदार सर मी तुमचं करते..मी पाच हजार आणले मला डायरेक्ट नाही बोलाव वाटत..पुन्हा दोन तीन दिवसात करुन दिन मी पाच हजाराच तुम्हाला..असे बोलल्या त्यावेळी पीएसआय पासलकर ते झेरॉक्सचे पाच पाच सेट काढावे लागतात. असे म्हणुन तक्रारदार यांना बाहेर पाच मीनीटे



Scanned with OKEN Scanner

थांबायला सांगतात. त्यावेळी तक्रारदार हया माझ्याकडं पाहुणे आहेत असे सांगतात तरी सुध्दा पीएसआय पासलकर हे तक्रारदार यांना बसा बसा असे म्हणुन थांबवुन घेतात व पो.स्टे.मुकुंदवाडी च्या वरच्या मजल्यावरुन खाली जा मी खाली येतो असे सांगुन तक्रारदार यांना खाली (जमीनीवर) पाठवितात व ते स्वत: तक्रारदार महिलेशी खाली येऊन बोलतात ते भेटले नाही का तुम्हाला राठोड असे विचारतात त्यावेळी तक्रारदार गाडी काढले आणं गेले असे सांगतात तर पीएसआय पासलकर त्यांचा नंबर आहे का तुमच्याकडं असे म्हणुन त्यांचा रायटर राठोड यांना फोन करायला लावतात त्यावेळी तक्रारदार यांनी राठोड यांना फोन केला परंतू ते व्यस्त होते.
त्यानंतर राठोड हे तक्रारदार यांचेजवळ येतात व काय झालं असे विचारतात त्यावेळी तक्रारदार यांनी पाण्या पावसाची बेजारी असे बोलल्या त्यावेळी राठोड ते घ्यायला घाबरता ना लोक घ्यायला घाबरता ना.. कॅमेरा वगैरे नही न बंद हे न तक्रारदार कशाचे कॅमरे आण कशाचं काय, त्यावेळी राठोड ते साहेब घाबरत होते घ्यायला..तक्रारदार कॅमेरे कशाचे कुठे कॅमेरे अरे एवढे काय घाबरु लागले राठोड मी अस काही करत नाही साहेबाच हे आपण अस काही करत नाही..तै गाडी हे का गाडी दोन नंबरची गाडी टु व्हिलर तक्रारदार हं.. राठोड तिच्या मुंडक्यात टाकुन दया.. तक्रारदार इकडल्या साईडची का इकडच्या साईडची, राठोड पलीकडची उभी हे का ती..तक्रारदार हां..पण सर तेवढं अक्षयच मनावर करा तुम्ही, राठोड बर करतो..तक्रारदार पण कोणी हे तर नाही करणार पाच हजार टाकले मी तेच्यात कोणी काढुन नेईल पुन्हा, राठोड कोणी नाही नेणार ठेवले ना.. तक्रारदार हां.. असे म्हणुन लाचेची रक्कम 5,000/- रुपये अॅन्थ्रॉसीन पावडर लावलेली स्विकारलेली आहे. त्यानंतर तक्रारदार यांचा लाच स्विकारल्याचा इशारा आल्यानंतर पंच क्र.2 व सापळा पथकासह घटनास्थळी तात्काळ हजर होऊन, लाचेच्या रकमेसह लोकसेवक पीएसआय पासलकर व त्यांचा रायटर राठोड पोलीस यांना 20.20 वा.ताब्यात घेतले. दोन्ही पंचासमक्ष वरील घटनेविषयी विचारपुस करुन, पुढील कार्यवाही पुर्ण केली त्याबाबत सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी यातील तक्रारदार महिला श्रीमती प्रतिभा सिनगारे यांचेसह त्यांच्या मुलावर पो.स्टे.मुकुंदवाडी गु.र.नं. 363/2026 कलम- 109(1),118(1),351(2),352(3,5) भा.न्या.सं.अन्वये दाखल असलेल्या गुन्हयात तक्रारदार व त्यांच्या दोन मुले जयमंगल व अक्षय यांना सदर गुन्हयात मदत करण्यासाठी, अक्षय याला जेलमधुन बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी आरोपी क्र.2 सुभाष छगन राठोड पोलीस अंमलदार पो.स्टे.मुकुंदवाडी यांनी वरील गुन्हयाचे तपास अधिकारी आलोसे क्र.1 प्रशांत बाळासाहेब पासलकर पीएसआय पो.स्टे.मुकुंदवाडी यांच्या सुचनेवरुन व त्यांचेशी संगणमत करुन, तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष दि.07/09/2026 रोजी 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन, तडजोडी अंती 5,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. व मागणी केलेली लाचेची रक्कम दि. 08/09/2026 रोजी पो.स्टे.मुकुंदवाडी आवारात दुचाकी मो.सा.क्र.एम एच 20 ई ऐ 5682 युनिकॉन चे हेड लाईटच्या वरील कप्यातुन (मुंडक्यातून) काढुन त्याच्याकडील पांढऱ्या रंगाचे हात रुमालात गुंडाळुन हातात घेऊन, पो.स्टे.मुकुंदवाडीच्या वरच्या मजल्यावरील पीएसआय पासलकर यांचे कामाचे कक्षात घेऊन गेले अशा प्रकारे लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली.
म्हणुन यातील आलोसे पीएसआय प्रशांत पासलकर (तपास अधिकारी) यांनी स्वत: करीता, त्यांचेकडे तपासावर असलेल्या वरील गुन्हयात तक्रारदार व त्यांच्या मुलांना मदत करण्यासाठी सापळा कारवाईवेळी स्वत: देखील पंचासमक्ष दोन्ही हाताच्या पुर्ण बोटांनी दहा असा इशारा करुन, लाचेची मागणी केली. आल

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VIVEK DILIP SONWANE(I (Inspector)) / POBN84952 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

PSI
दि. अ. अधिकारी
पोलिस ठाणे मुकुंदवाडी
छत्रपती संभाजीनगर (श)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VIVEK DILIP SONW
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84952

Gaigate
PI TBOTe ACB

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner